दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २९२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१६ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## श्रीवर्धन तालुक्यात सुसज्ज दर्जेदार पशुवैधकीय दवाखाना निर्माण करणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यातील रानवली येथील राष्ट्रीय पेय जल अंतर्गत ७० लाख खर्चाची नवीन पुरजोडणी योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कामाचे लोकार्पण पालकमंत्री ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोल–ताना ना.अदिती तटकरे म्हणाल्या कि, या पूर्वी ३६ लाखाची पाणी योजना या गावात होती, आता ७० लाखाची नवीन पुर्नजोडणी योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कामाचे लोकार्पण करताना मनस्वी आनंद होत आहे. अपूर्ण कामांचे लोकार्पण करणे हे आम्हाला कधीच जमत नाही, काम लवकरात लवकर पूर्ण करून लोकार्पण करणे हाच मूळ उद्देश असतो. रानवली गावातील राहिलेली विकासकामे लवकरात लवकर पूर्ण करू, ग्रामदेवतेच्या मंदिराला स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून माझ्या आमदार निधीतुन ५ लाख देणार असल्याचे जाहीर करून, तालुक्यात सुसज्ज दर्जेदार सेवा देणारे पशुवैद्यकीय दवाखाना उभारणार असल्याचे सांगितले.



या वेळी व्यासपीठावर रानवली सरपंच सौ गजमल, ग्रामपंचायत सदस्य सुरेश मांडवकर, सर्व सदस्य, तालुकाध्यक्ष दर्शन विचारे आदी मान्यवर उपस्थतीत होते. या वेळी अदितीताईंच्या हस्ते ग्रामपंचायतच्या वतीने कोरोना योद्धयांचा सत्कार करण्यात आला.

रानवली नंतर तालुक्यातील शिरवणे येथे जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी योजनेचे नाम अदितीताई तटकरे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी स्थानिक महिला मंडळाने हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात अदितीताई सहभागी झाल्या होत्या. शिरवणे गा–वातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे नाम अदितीताईंनी आश्वासित केले. खासदार तटकरे, ना. आदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांनी विकास कामाचा धडाका लावल्याने नागरिकांत आनंदाचे व समाधानाचे वा–तावरण निर्माण झाले आहे

## जिल्ह्यातील निर्यात व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी पायाभूत सुविधा विकासावर भर दिला जाईल : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा विविधतेने नटलेला जिल्हा आहे. येथील निर्यात व्यवसायास मोठा वाव आहे. त्यामुळे जिल्ह्यातील निर्यात व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर दिला जाईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात निर्यात प्रचालन समितीची ऑनलाईन बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, तळोजा मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे व महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे प्रतिनिधी आदि उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी बैठकीच्या सुरुवातीला रायगड जिल्ह्यातील निर्यात प्रचालन क्षेत्रात वाव असलेल्या विविध उद्योगांची माहिती घेतली. यासंदर्भात त्यांनी जिल्ह्यातील उद्योजकांना आवाहन केले आहे की, त्यांनी निर्यात व्यवसायासाठी रायगड जिल्ह्यात कोणकोणत्या क्षेत्रात वाव आहे, निर्यात व्यवसाय वाढीस लागण्यासाठी कोणकोणते घटक व अन्य सोयी सुविधांची आवश्यकता आहे याबाबत जिल्हा प्रशासनास पुढे येऊन सांगावे.

यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री. हरळय्या यांनी जिल्ह्यात प्रामुख्याने गणेशमूर्ती, मत्स्यव्यवसाय, लोखंड व स्टील, केमिकल, लॉजिस्टिक, पांढरा कांदा, अल्फान्सो आंबा, फार्मास्यूटिकल अशा विविध .../२

## शिवसेना-राष्ट्रवादीत वाद ; दिघी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील वाकळघर, ना–गलोली, वावेपंचतन परिसरात शिवसेनेकडून झालेल्या विकासकामांचा लावण्यात आलेला होर्डिंग फाडण्यात आला. हा होर्डिंग्ज फाडल्याने दोन पक्षात नव्या वादाची ठिणगी पडली असून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी फाडून टाकल्याचा आरोप शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. याबाबत दिघी सागरी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार करण्यात केली आहे.

तालुक्यातील वाकलघर, नागलोली, वावेपंचतन या गावांसाठी पाणी पुरवठा योजना मंजूर झाल्या आहेत. या योजना शिवसेनेच्या पदाधिकार्यांनी राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे पाठपुरावा करुन मंजूर केल्याचे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे तसे होर्डींग त्यांनी त्या परिसरात लावले होते. मात्र, शुक्रवारी वाकलघर येथील होर्डींग काही अज्ञातांनी फाडून टाकल्याने शिवसैनिक चांगलेच संतप्त झाले आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेची माहिती सर्वत्र पसरली आणि गावागावांतून शिवसैनिक एकत्र येत त्यांनी संशयित इसमांविरोधात आक्रमक भूमिका घेतली. शिवसेना उपतालुकाप्रमुख अरुण शिगवण यांनी हे कृत्य राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केल्याचा आरोप केला आहे. तशी तक्रार शिगवण यांनी दिघी सागरी पोलीस ठाण्यात केली आहे. तक्रारीमध्ये राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दर्शन विचारे यांच्या सांगण्यावरुन संदेश गुजर, संतोष भोगल, सुनिल चव्हाण, संदेश काते, संजय तटकरे, विजय पाडावे, सचिन विचारे यांनी वाकलघर येथील होर्डींग फाडून मोडतोड केल्याचे म्हटले आहे. या कार्यकर्त्यांवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. यावेळी उपतालुकाप्रमुख सुकुमार तोंडलेकर, सभापती बाबुराव चोरगे, माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश कोळंबेकर, विभागप्रमुख गजानन कदम, शरद महाडीक उपस्थित होते. तर शेकडो शिवसैनिक दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या आ–वारात जमा झाले होते. महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष असणार्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजूनही वाद विवाद सुरूच आहेत. पालकमंत्र्याचा मतदार संघ असलेल्या श्रीवर्धनमध्ये आता नव्या वादाला तोंड फुटले आहे.

## पेण को ऑपरेटीव्ह अर्बन बँक ठेवीदारांच्या स्वाक्षरी मोहिमेस उस्फुर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

पेण को ऑपरेटिंव्ह अर्बन बँकेचे खातेदार आणि ठेवीदार यांचे पैसे मिळावे यासाठी बरीच आंदोलन , उपोषण, झाली मात्र त्यांच्या लढ्याला अद्याप यश आले नाही,आपल्या कष्टाचे, हक्काचे पैसे– पैसे करून अनेक जणांचे मृत्यू झाले,पुन्हा एकदा लढा म्हणून कर्जत मध्ये स्वाक्षरी मोहिमेचे आंदोलन करण्यात आले या आंदोलनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

गेल्या १० ते ११ वर्षांपासून पेण को ऑपरेटिव्ह अर्बन बँकेचे खातेदार आणि ठेवीदार त्यांचे पैसे परत मिळावे यासाठी विविध मार्गातून लढा देत आहेत परंतु अजून या लढ्याला यश आलेले नाही. म्हणून भाजपचे नेते सुनिल गोगटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिल्ली येथे केंद्रिय अर्थमंत्री अनुराग ठाकूर आणि डॉ. भागवत कराड यांची भेट घेऊन खातेदार आणि ठेवीदारांना लवकरात लवकर पैसे मिळावे यासाठी निवेदना द्वारे मागणी केली होती, त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद सुध्दा दिला. आता नव्याने झालेल्या कायद्या प्रमाणे ५ लाखाच्या ठेवी पर्यत ठेवीदारांना संरक्षण देण्यात आले आहे. त्याचे आधारे पेण को ऑप अर्बन बँकेच्या ठेवीदारांना संरक्षित करून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत द्यावे यासाठी ठेवीदारांची स्वाक्षरी मोहीम आंदोलन कर्जत मधील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक चौकात सुरू करण्यात आले, त्यास खातेदार आणि ठेवीदारांनी उस्फुर्त प्रतिसाद देत स्वाक्षऱ्या केल्या.

ही मोहीम रायगड आणि .../२






# निकोपतेवर चिरा

हे जग सुंदर आहे. सारेच असे म्हणतात. जगातील क्रूरता, द्वेष, अत्याचार मात्र सरता सरत नाही. उलट दिवसेंदिवस हिंसाचाराचे विक्राळ रूप पुढे येऊ लागले आहे. जगण्याचे सारे ऐश्वर्य माझ्या एकट्याच्या झोळीत यावे ही मानसिकता कदाचित हिंसेला प्रवृत्त करीत असावी. आपण इतरांशी कसे वागावे, या प्रश्नाचे उत्तर 'आपल्याशी इतरांनी जसे वागणे अपेक्षित आहे तसे' या उत्तरात आहे. माणसांचा वापर आणि वस्तूंचा उपयोग करून घेणाऱ्यांनी मात्र विज्ञानालाही गुडघे टेकण्यास भाग पाडले. अनिश्चिततेने परिपक्वता वाढविण्याऐवजी संपत्तीचा पाठलाग वाढविला. घाई पांघरलेल्या जिवांना हव्यासांच्या शर्यतीने वेडे करून सोडले आहे. करोना काळाने अस्थिरतेचा प्रकोप अनुभवला. जिवांचे रक्षण करताना धनसंपत्ती किंवा अहंता नव्हे, तर परोपकार कामाला येतो, याचा साक्षात्कार देणारा हा काळ आहे. मानवी अस्तित्वातील क्षणभंगुरता दाट होत असतानाही गुन्हे आलेख झुकलेला नाही. नातेसंबंधांत विश्वास मोलाचा असतो. स्त्री-पुरुष संबंधांत तर आदराला पर्यायच नाही. 'नकारा'चे महत्त्व न कळल्याने संतापातून गुन्हे घडतात. जागतिक गुन्हेविश्वाचा मागोवा घेतला तरी हे तथ्य लक्षात येते. स्त्री-पुरुष संबंधातील बहुतेक गुन्ह्यांचे मूळ वर्चस्व, अधिकार आणि लालसेत दडले असते. वर्धा जिल्ह्यातील अवैध गर्भपाताच्या घटनेने या सर्व शक्यतांना उजळा दिला. अवघ्या राज्याला हादरवूनही सोडले. यातील गर्भपाताची पार्श्वभूमी जितकी क्लेषकारक आहे, त्याहून मोठा मानसिक धक्का महिला प्रसूतितज्ज्ञाच्या बेकायदा वर्तणुकीने दिला. एका अल्पवयीन मुलीला मुलाकडच्यांनी बळजोरीने अवैध गर्भपाताला राजी केले. तो करताना त्यांनी कायद्याची चौकट नाकारली. गर्भपातानंतर मुलीकडच्यांनी पोलिस तक्रार करण्याचे धाडस दाखविले. या हिमतीतूनच अर्भकांच्या कवट्यांचे जमिनीत पुरलेले वास्तव जगापुढे आले. कितीही बंधने असली तरी अमलात न येणारा कायदा धूळ खाणारा दस्तऐवज ठरतो. वर्धा जिल्ह्यातील कदम हॉस्पिटलच्या संचालिकेने ज्या पद्धतीने अवैध गर्भपातांचा सपाटा लावला, तो बघून उच्चविद्याविभूषितांच्या कलुषित मनांची कल्पना येते. 'मुलगी शिकली प्रगती झाली' या बोधवाक्याने सर्वशिक्षा अभियानाची मोहीम भलेही लोकप्रिय केली असेल; शिकलेल्या मुलींना संयमाने, विवेकाने वागण्याचे धडे देण्याचीही फार गरज असल्याचे जळजळीत वास्तव आर्वीतील प्रसूतितज्ज्ञेच्या कृत्यांनी समाजापुढे आणले. त्यांच्या दवाखान्यामागील बायोगॅसच्या खड्ड्यात ११ मानवी कवट्या आणि अनेक हाडांचे तुकडे सापडले. संबंधित अल्पवयीन मुलीच्या प्रकरणातील गर्भ त्याच ठिकाणी पुरल्याची कबुली तिने दिली. अनेक अर्भकांची हाडे तेथून ताब्यात घेण्यात आली. मुख्य आरोपी डॉ. रेखा कदम अटकेत आहे. बीडमधील डॉ. सुदाम मुंडे प्रकरणाची ही पुनरावृत्ती आहे. शहरी भागापासून गावपातळीपर्यंत अवैध गर्भपाताचे सर्रास पीक आहे. प्रतिष्ठेपोटी काही प्रकरणे दडपली जातात. काहींचा बभ्रा होतो. महिलांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी जगभरात २८ सप्टेंबरला 'सुरक्षित गर्भपात दिन' पाळला जातो. देशातील वैद्यकीय गर्भपात कायदा पुरेसा सुस्पष्ट आणि पारदर्शी आहे. १० ऑगस्ट १९७१ रोजी हा कायदा लागू झाला. २००२मध्ये त्यात सुधारणाही झाली. गर्भपातासाठी पती किंवा कुटुंबातील कोणत्याही कौटुंबिक सदस्याची संमती आवश्यक नसते. अल्पवयीन किंवा मानसिक आजारी मुलींच्या गर्भपातासाठी मात्र पालकांची परवानगी आवश्यक असते. सुरक्षित गर्भपातांची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून गर्भपात केंद्रांना मान्यता देण्याचे राज्यपातळीवरील अधिकार जिल्हास्तरावर आणण्यात आले. या विकेंद्रीकरणानंतरही मंजुरी देणाऱ्या समितीत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याखेरीज स्त्रीरोगतज्ज्ञ, स्थानिक वैद्यकीय व्यावसायिक, बिगरसरकारी संस्थेचे प्रतिनिधी आणि जिल्ह्यातील पंचायत राज संस्थेच्या प्रतिनिधींचा समावेश आवश्यक असतो. त्यात महिला सदस्य बंधनकारक आहे. गर्भपात केंद्रांची मान्यता रद्द करण्याचा अधिकार जिल्हा देखरेख समितीला आहे. कायदाभंग करणाऱ्यांना दोन ते सात वर्षांची शिक्षा होते. आर्वीतील दवाखान्याला कुणाचे संरक्षण आहे हे शोधून काढायला हवे. दोषींसोबत अत्याचारग्रस्तांचाही विचार व्हावा. बलात्कारपीडितेला खरे संरक्षण सामाजिक वागणुकीतून मिळावे अशी अपेक्षा वर्धा जिल्ह्यात वास्तव्य केलेल्या महात्म्याने व्यक्त केली होती. समाजात या आचरणातील सुधारणेला अद्यापही खूप वाव आहे. स्वत:पुरता विचार करून जग सुंदर करण्याची कल्पनाच भ्रामक ठरते. प्रख्यात साहित्यिक प्रेमचंद यांना एकाने प्रश्न विचारला, 'अवघे जग केव्हा सुंदर होणार?' प्रेमचंद यांचे उत्तर होते, 'पुरुष महिलांसारखे वागायला लागतील तेव्हा.' महिलांची सहृदयता सर्वत्र झिरपावी अशीच अपेक्षा प्रेमचंद यांनाही असावी. वर्ध्यातील प्रसूतितज्ज्ञ डॉक्टरने अवैध गर्भपातांसोबत जगातील निकोपतेवर विश्वास ठेवणाऱ्यांचाही गळा चिरला. बाजारपठेत हव्यासांचे पीक डवरते आहे. जगण्याची सुंदरता त्याखाली पुरली जाऊ नये, या प्रार्थनेखेरीज आपणही काय करू शकतो?

# अविनाश पाटील - खोपोलीतील एक सायकलस्वार अवलिया

**दै.रायगड नगरी । खोपोली**

काहीतरी नावीन्य करायचे असे काही लोक मनाशी खूणगाठ बांधतात आणि ती पूर्णत्वास ही नेतात. असेच खोपो-लीतील एक व्यक्तिमत्व म्हणजे अविनाश पाटील. खोपोली शहराचे नाव ज्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले अशी ही व्यक्ती.अविनाशने ही सायकलवर महाराष्ट्राची भ्रमंती करून पर्यावरण संवर्धन हा विषय महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याचा संकल्प केला आणि तो पूर्णत्वास नेला.



अविनाशने १४ डिसेंबर २०२१ रोजी खोपोलीतून सायकलवर महाराष्ट्र फिरण्याचे ध्येय घेऊन साधारण ३००० किमी सायकल चालवित संपूर्ण महाराष्ट्र ३० दिवसांत पालथा घातला. दि. १३ जानेवारी २०२२ रोजी खोपोली येथे तो आपल्या घरी परत आला.

अविनाशने पर्यावरण संवर्धनचा संदेश घेऊन अलिबाग, मुरुड, गुहागर, मुरुड (रत्नागिरी) असा प्रवास करीत तो महाराष्ट्राचे दक्षिण टोक असलेल्या सावंतवाडी इथपर्यंत तिथून त्याने आंबोली घाटातून पुढे आजरा, अदमापूर मार्गे कोल्हापूर पुढे सांगली, मिरज, पंढरपूर, सोलापूर, चाकूर (लातूर), नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर, अमरावती, भुसावळ, जळगाव, धुळे, नाशिक, जव्हार, कासा/मनोर, गेटवे ऑफ इंडियापर्यंत आणि तिथून खोपोली ही सायकल भ्रमंती एकूण ३००० किमीची प्रवास त्याने एकट्याने केला.

ह्या प्रवासात त्याला विविध ठिकाणची लोक, संस्था भेटल्या. त्याच्याबरोबर त्यांनी अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले. ह्या भ्रमंतीसाठी अविनाशला जाग-ेजागी थचज, मराठा संघ ह्या सारख्या सामाजिक संस्थांनी मदतीचा हात दिला. त्याला अशाच पुढच्या आशा साहसी मोहिमांसाठी शिवसेना शहर प्रमुख सुनील पाटील, मा. नगरसेवक संदिप पाटील, अमोल जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

# तळोजा येथून ट्रकची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात उभ्या करून ठेवलेल्या लाखो रुपये किंमतीच्या ट्रकची चोरी केल्याची घटना घडली आहे.

नागझरी गावात राहणारे ज्ञानेश्वर चव्हाण यांनी त्यांचा ट्रक क्र.एमएच-०४-डीके-७४८४ हा तळोजा औद्योगिक वसाहतीच्या रस्त्यावर उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्याने सदर ट्रक चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मोटार सायकलच्या अपघातात एकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार सायकलला झालेल्या अपघातात मोटार सायकलस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना कळंबोली वसाहत परिसरात घडली आहे.

सोमा कढरे हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकल घेवून मुर्बी या आपल्या घरी येत असताना त्याला अज्ञात वाहनाची धडक बसल्याने झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होवून त्यात त्याचा मृत्यू झाला आहे.

# स्पीड बेकर देताहेत अपघातांना आमंत्रण एकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्नाळा अभयारण्या समोर रस्त्यावर टाकलेल्या स्पीडब्रेकर मूळे एकाच जीव गेला आहे. ज्ञानेश्वर पाटील असे मृत इसमाचे नाव आहे. अपघातांना आमंत्रण देणारे हे स्पीड ब्रेकर काढून टाकण्याची मागणी केली जात आहे.

ज्ञानेश्वर पाटील हे त्यांचे मित्र सौरभ भोजनी यांच्यासोबत मुंबई-गोवा महामार्ग येथून दुचाकीवरून जात होते. त्यांची गाडी कर्नाळा अभयारण्य परिसरात आली असता पुढे असणाऱ्या गाडीने स्पीड ब्रेकर मुळे ब्रेक दाबला. त्यामूळे सौरभ याचा दुचाकीने पुढे जाणाऱ्या गाडीला पाठीमागून धडक दिली. यात ज्ञानेश्वर पाटील यांचा मृत्यू झाला. कर्नाळा अभयारण्य येथे टाकण्यात आलेल्या स्पीड ब्रेकर मुळेच ज्ञानेश्वर पाटील यांचा मृत्यू झाला असल्याचे बोलले जात आहे. मात्र हे स्पीड ब्रेकर कोणी टाकले याबाबत कुठेही वाच्यता करण्यात येत नाही.

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात
आर.टी.एस.अपिल नं.    /२०१८

श्री.प्रकाश चांगू पाटील
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती
रा.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड    अपिलकार
विरुद्ध
१) श्री.विनायक महादेव मानकामे
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती
रा.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.दिनकर महादेव मानकामे
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
रा.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड
३) यशवंतनगर आग्रो इंडस्ट्रीज कंपनीतर्फे चेअरमन
भागोजी गोविंद दळवी व इतर
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
रा.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.शांतीलाल जयवंतराज मेहता
वय : ६२ वर्षे, धंदा : व्यापार
रा.७०६, बसोरा, सी.एच.एस.सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई
५) मे.नवकार कार्पोरेशन लि.तर्फे डायरेक्टर
श्री.नेमीचंद जयवंतराज मेहता
वय : ६४ वर्षे, धंदा : व्यापार
रा.२०५, २०५ जे.के.चेम्बर्स, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई    रेस्पॉडंट

आपणास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अपिलकार श्री.प्रकाश चांगू पाटील यांनी वरील नमूद रेस्पॉडंट नं.१ ते ५ यांचे विरुद्ध मा.उपविभागीय अधिकारी साहेब पनवेल यांचे कोर्टात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये आार.टी.एस.अपिल दाखल केलेले असून सदर अपिलाचे काम सुनावणीसाठी पुढील तारीख २४/०१/२०२२ रोजी सकाळी १०.३ वाजता पनवेल येथील मे.उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कोर्टात नेमलेली आहे.

तरी सदर अपिलाचे कामी नेमलेल्या तारखेस मे.कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे अन्यथा आपल्याला सदर कामी काही सांगावयाचे नाही असे समजून पुढील कोर्टात कार्यवाही करण्यात येईल असे या नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते हे आपणास कळावे.

पनवेल
तारीख १४/०१/२०२२    **सही/-**
**अपिलकार**

मे.राव सो कोर्ट
ॲड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.३१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०२/२०२२

कै.नथुराम सखाराम पतंगे, मयतचे वारस
श्रीमती.सुलभा रजनीकांत पतंगे
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१०१, पांडुरंग निवास, हनुमान सोसायटी,
नांदिवली रोड, कलावती मंदिरा जवळ, डोंबिवली (पु.)    अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही    सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. नथुराम सखाराम पतंगे यांची सुन आहे. कै.नथुराम सखाराम पतंगे यांचे निधन दि.१/०४/१९८७ रोजी डोंबिवली येथे झालेले आहे. तसेच त्यांचे पश्चात त्यांची पत्नी कै.पार्वतीबाई नथुराम पतंगे यांचे निधन दि.२१/०४/१९८७ रोजी डोंबिवली येथे झालेले आहे. तसेच कै.नथुराम सखाराम पतंगे यांचा मुलगा कै.रजनीकांत नथुराम पतंगे यांचे निधन दि.२५/०३/१९९८ रोजी डोंबिवली येथे झालेले आहे. तसेच कै.नथुराम सखाराम पतंगे त्यांची आई कै.सखुबाई सखाराम पतंगे यांचे निधन दि.२९/०५/१९५३ रोजी पनवेल या ठिकाणी झालेले असून श्रीमती.सुलभा रजनीकांत पतंगे ह्यांनी कै.नथुराम सखाराम पतंगे यांच्या खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : सांगडे व पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| सांगडे | १४४/४ | ०.०४.०० | ०.४१ |
| | १७८/५ | ०.१२.१० | ०.३७ |
| | ५२/१ | ०.०९.०० | १.७५ |
| पनवेल | ७६९/४ ब | ०.५०.७० | --- |

वरील मिळकत ही कै.नथुराम सखाराम पतंगे यांच्या मालकीची आहे. कै.नथुराम सखाराम पतंगे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट कै.नथुराम सखाराम पतंगे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.नथुराम सखाराम पतंगे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१५/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**    कोर्टाचा शिक्का    **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

ॲड.मनिषा वारंगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.९७७/२०२१
नि.नं.९/ड

१) विजय कृष्णाजीराव कदम
वय : ५८ वर्षे, धंदा : काही नाही
२) वसंत कृष्णाजीराव कदम
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.पो.कोयनावेळे (घोटकॅम्प),
घर नं.६१ बी, ता.पनवेल, जि.रायगड    अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. कृष्णाजीराव आबाजी कदम हे दि.१९/०३/२००४ रोजी मयत झालेले असून त्यांची पत्नी राधिका कृष्णाजीराव कदम ह्या दि.१४/११/१९९२ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांनी खालल वर्णनाची मिळकतीबाबत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

**अ) मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| २७५ | ५ | २-८१-०० |

ब) मौजे : रिळे, ता.माणगाव, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन

| खाता क्रं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १८१ | ८१ | १३/ब | ०-५१-२५ | ०.०० |

अर्जदार हे कै.कृष्णाजीराव आबाजी कदम यांचे वरील मिळकतीस कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, तर या कालावधीत योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हकाबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.कृष्णाजीराव आबाजी कदम यांचया वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
दि.६/१०/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**    कोर्टाचा शिक्का    **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

अर्जदारांचे वकील : अशोक ज. शेकडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१५७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०२/२०२२

१) श्री.गगन विष्णू ठाकूर
२) श्रीमती.जनाबाई विष्णू ठाकूर
३) श्री.धर्मेंद्र विष्णू ठाकूर
४) श्रीमती.सुवर्णा चिंतामण गायकर
५) श्री.अमृत विष्णू ठाकूर
सर्व रा.पत्ता हाऊस नं.३९१, कोपरागांव, सेक्टर १०,
खारघर, नवी मुंबई ४१०२१०    अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री.गगन विष्णू ठाकूर २) श्रीमती.जनाबाई विष्णू ठाकूर ३) श्री.धर्मेंद्र विष्णू ठाकूर ४) श्रीमती.सुवर्णा चिंतामण गायकर ५) श्री.अमृत विष्णू ठाकूर रा.पत्ता हाऊस नं.३९१, कोपरागांव, सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई ४१०२१० हे मयत श्री.विष्णू अर्जुन ठाकूर यांच्या खालील मालकी हक्क असलेली मिळकतीचे वारस आहेत.

| अ.क्र. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | खारघर | १५५ | १८ | ०-१०-४ | खारघर २७ |
| २ | खारघर | १९८ | ४ | ०-०४-५ | खारघर २८ |
| ३ | खारघर | २०४ | ३ | ०-०८-१ | खारघर २७ |
| ४ | खारघर | ३१४ | ९ | ०-०२-५<br>०-०४-८ | खारघर ३१८ |
| ५ | खारघर | २९५ | २ | ०-२९-३ | खारघर ३१८ |
| ६ | खारघर | २०० | १ ते ८ ब | ०-३८-४ | खारघर ३१८ |

१) श्री.गगन विष्णू ठाकूर २) श्रीमती.जनाबाई विष्णू ठाकूर ३) श्री. धर्मेंद्र विष्णू ठाकूर ४) श्रीमती.सुवर्णा चिंतामण गायकर ५) श्री.अमृत विष्णू ठाकूर अर्जदार यांनी मा.न्यायालयात वारसा प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केला असून सदर कोणास काही हरकत वा असे कोणास समजविण्याचे असेल तर या नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीत योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे न्यायालय अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल व त्यांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल. तसेच त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज    सन    रोजी माझ्या सहीने व या मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**    कोर्टाचा शिक्का    **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

ॲड.शशिकांत आ. म्हात्रे
ॲड.निलेश द. हातमोडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.४६/२०२२
ने.ता.१६/०२/२०२२

श्री.प्रतिक देविदास पाटील
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.पो.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड    अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वाजे
ता.पनवेल, जि.रायगड    सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची आई कै.शकुंतला देविदास पाटील दि.०१/०३/२००९ रोजी मु.पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार श्री.प्रतिक देविदास पाटील यांची आई कै.शकुंतला देविदास पाटील यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखविल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१५/०१/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल**    कोर्टाचा शिक्का    **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे सो
अर्जदारांकरिता ॲडव्होकेट ॲड.उदय प्र. मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१५३५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०२/२०२२

(कै.गणपत जगू कुरणे यांचे कायदेशीर वारस)
१) श्रीमती.मनिषा गणपत कुरणे (पत्नी)
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
आधार कार्ड नं.३८००३४३८४१८५
२) कु.मृणाली गणपत कुरणे (मुलगी)
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
आधार कार्ड नं.६५६९३७४१७७१२
अर्जदार १ व २ रा.रुम नं.बी/२:४,
बिल्डींग नं.अे-११, सेक्टर नं.८,
प्रभुकुंज को.ऑप.हौ.सोसायटी, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (पश्चिम)-४१०२०६    अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही    सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. गणपत जगू कुरणे यांचे निधन दि.२२/०९/२०१७ रोजी मुंबई येथे झालेले आहे. कै.गणपत जगु कुरणे यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. गणपत जगु कुरणे कायदेशीर वारस आाहेत. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.गणपत जगु कुरणे यांनी नवीन पनवेल, पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे : नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्रं. : बी/२:४,**
**बिल्डींग नं.अे-११**
**सेक्टर-८,**
**प्रभुकुंज को.ऑप.हौ.सोसायटी,**
**क्षेत्रफळ : १८.२२० स्क्वे.मीटर**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.गणपत जगु कुरणे अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १४/०१/२०२२

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**    कोर्टाचा शिक्का    **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# पायाभूत सुविधा विकासावर भर दिला जाईल : जिल्हाधिकारी

क्षेत्रात निर्यात व्यवसाय वाढीस लावण्यासाठी पूरक परिस्थिती असल्याचे सांगितले.

जिल्ह्यात पांढरा कांद्याचे २५० हेक्टर उत्पादन क्षेत्र असून जवळपास ४ हजार मेट्रिक टन इतके उत्पादन होत आहे, यात २०० ते २२५ शेतकरी सक्रिय आहेत. या पांढऱ्या कांद्याला नुकतेच दि.९ सप्टेंबर २०२१ रोजी अलिबाग तालुक्यासाठी भौगोलिक मानांकनास मान्यताही मिळाली आहे. त्याचप्रमाणे रायगडच्या अल्फान्सो मँगोची जिल्ह्यात जवळपास १४ हजार हेक्टर क्षेत्रावर लागवड होत असून जवळपास ३० हजार मेट्रिक टन उत्पादन आहे.

रायगड जिल्ह्यास १२२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून येथे मत्स्योत्पादन व्यवसायात अंदाजे ४० हजार मेट्रिक टन उत्पादन घेतले जाते. केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज च्या अंतर्गत डायरेक्टर जनरल ऑफ कमर्शियल इंटेलिजन्स अँड स्टॅटिस्टिकस या विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार सध्या महाराष्ट्राचा निर्यात व्यवसाय रू.२.५ लाख कोटी इतका असून रायगड जिल्ह्याचा ऑक्टोबर २०२१ पर्यंतचा निर्यात व्यवसाय जवळपास रु.२० हजार कोटी म्हणजेच महाराष्ट्राच्या एकूण निर्यात व्यवसायाच्या ७.५६ टक्के इतका आहे तर एकूण कोकण पट्ट्यातील निर्यात व्यवसायात रायगड जिल्ह्याचे योगदान ३४ टक्के आहे. तरी रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजकांनी निर्यातक्षम उद्योग वाढीसाठी पुढे यावे, त्यांना जिल्हा प्रशासनाकडून सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सहकार्य केले जाईल, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

# पेण को ऑपरेटिंव्ह अर्बन बँक ठेवीदारांच्या स्वाक्षरी मोहिमेस कर्जत उस्फुर्त प्रतिसाद

मुंबई येथील शाखा असलेल्या शहरात राबविण्यात येणार असल्याचे भाजपचे नेते सुनील गोगटे यांनी सांगितले. याप्रसंगी संजय कराळे बळवंत घुमरे, प्रकाश पालकर, मयूर शितोळे, स्नेहा गोगटे, प्रीती तिवारी, विजय कुलकर्णी, श्रीनिवास राव, दिनेश गणेगा, सर्वेश गोगटे, सूर्यकांत गुप्ता, रजनी वैद्य, समीर सोहोनी, सागर खडे, संगीता गोडबोले, दीनु वैद्य आदी सह जेष्ठ नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कमलाकर लबडे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये अनेक वर्षांपासून एम.एस. ई.बी.मध्ये मानधनावर कार्यरत असणारे कमलाकर लबडे काही दिवसांपासून त्यांना आजाराने ग्रासले होते मुंबईत खाजगी दवाखान्यात उपचार सुरू असताना त्यांचे दि.१४ रोजी सायंकाळी निधन झाले.गावात केव्हाही लाईट संदर्भात तक्रार असल्यास तात्काळ हजर राहून लोकांची कामे पूर्ण करून देण्यात त्यांचा हातखंडा होता.लहानपणापासून सर्व प्रकारची मोलमजुरीची कामे त्यांनी केली आहेत. काही वर्षांपासून ते एम.एस. ई.बी.मध्ये मानधनावर कार्यरत होते.कमलाकर



दवाखान्यात ऍडमिट झाले त्यावेळी त्यांना आर्थिक मदत उपलब्ध व्हावी यासाठी येथील धनगर समाजाचे अध्यक्ष राकेश कोकळे यांनी आपल्या सर्व मित्र परिवाराला सोबत घेऊन लोकवर्गणी जमा करून कमलाकर यांच्या हाती सुपूर्द केली होती. सर्वांशी अदबीने आणि प्रेमाने वागणारे कमलाकर यांच्या निधनाची वार्ता ऐकून सर्वानाच आश्चर्याचा धक्का बसला.आपल्या कुटुंबातीलच एक सदस्य गेल्याची भावना निर्माण झाली होती.सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली. कर्जत तालुक्यातील त्यांच्या गावी अंत्यदर्शनासाठी माथेरान करांनी धाव घेतली.

## हेमंत बिरामणे यांच्या स्मृतींना उजाळा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवसेनेचे एक खंबीर नेतृत्व असणारे उप शहरप्रमुख स्वर्गीय हेमंत सहदेव बिरामणे यांच्या प्रथम जयंती निमित्त महात्मा गांधी मार्गावरील हेमंत नाका या नामफलकास शिवसैनिकांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत, लोजिंग संघटनेचे अध्यक्ष कुलदीप जाधव, उप शहरप्रमुख सागर पाटील,सरचिटणीस वसंत कदम, उमेश लोखंडे, गणेश घावरे, पवन गडवीर, पवन कदम, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष राजेश दळवी, अनिल गायकवाड,नितीन ढेबे, उमेश ढेबे, विलास,जितू गेहलोत ,प्रतीक शेलार यांसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



## अज्ञात वाहनाच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनाच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना खारघर टोल नाका परिसरात घडली आहे.

अमोल कसबे हा इसम खारघर टोलनाका येथून मोटार सायकलवरुन जात असताना त्याला अज्ञात वाहनाची धडक बसल्याने झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी झाल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


मा.गोडसे सो

अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.जी.व्ही.मुकणे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१६०२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१५/०२/२०२२

१) श्रीमती.उर्मिला चंद्रमणी जाधव
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.शिवराज चंद्रमणी जाधव तर्फे
अ.पा.क.आाई
श्रीमती.उर्मिला चंद्रमणी जाधव
दोघे रा.पाटील नगर समोर १/११०,
आर.बी.टी.को.ऑप.हौ.सोसायटी,
मानखुर्द मुंबई, महाराष्ट्र ४०००४३ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

१) अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ यांचे वडील कै.चंद्रमणी शिवराम जाधव हे दि.१८/०२/२०२१ रोजी किंग इडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल आणि मेडीकल कॉलेज येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.चंद्रमणी शिवराम जाधव यांची आई कै.लक्ष्मी शिवराम जाधव ह्या देखील दि.१५/०९/१९८१ रोजी मुंबई या ठिकाणी मयत झालेले आहेत. तसेच कै.चंद्रमणी शिवराम जाधव यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाही. तसेच कै.चंद्रमाणी शिवराम जाधव यांच्या मालकीचे मौजे : पनवेल येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील सदनिका व काही जंगम मिळकत सुद्धा आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड**

| सदनिका क्रं. | क्षेत्र | इमारतीचे नांव व पत्ता | सर्व्हे नं./प्लॉट नं. |
|---|---|---|---|
| २०४ (दुसरा मजला) ''सी'' विंग | २३४ चौ. फूट कारपेट | महालक्ष्मी गार्डन, मौजे उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड | ३६ |

२) अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ कै.चंद्रमणी शिवराम जाधव यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.चंद्रमणी शिवराम जाधव यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

३) त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ कै.चंद्रमणी शिवराम जाधव यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १४/०१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


# जहाजातून अवैधरित्या डिझेलची खरेदी करून त्याची विक्री करणारी टोळी जेरबंद

## डिझेल व बोटिसह २५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने व राज्याच्या अन्न नागरी पुरवठा विभागाच्या दक्षता पथकाने उलवे येथील खाडी किनारी संयुक्तरित्या कारवाई करून समुद्रातील जहाजामधुन, अवैधरित्या डिझेल खरेदी करणारे व त्याची बेकायदेशीररीत्या विक्री करणाया टोळीला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २१ हजार ४७० लिटर (२१.४ टन) डिझेलसह डिझेलची विक्री करण्यासाठी वापरण्यात आलेल्या २ बोटी असा एकुण ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जफ्त केल्याची नवी मुंबईचे पोलिसा आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी दिली.

काही व्यक्ती समुद्रात असलेल्या जहाजातून अवैधरित्या कमी किंमतीत डिझेलची खरेदी करून, त्यांची बेकायदेशीररीत्या विक्री करत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेला मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे गुन्हे शाखा व मुंबई शिधावाटप विभागाचे नियंत्रक व राज्यस्तरीय दक्षता पथकाचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. त्यांनतर सदर पथकाने बुधवारी नवी मुंबईच्या सागरी किनारी खाजगी बोटीने टेहळणी सुरू केली. यावेळी उलवे जेट्टीपासून काही अंतरावर एक संशयास्पद बोट पुढे जात असल्याचे पथकाला आढळून आले. त्यामुळे पोलिसांच्या पथकाने सदर बोटीचा उरणच्या दिशेने जात असतांना त्याचा पाठलाग केला.

यावेळी सदरची बोट काही अंतरावर दुस्रया एका बोटी जवळ थांबल्याचे दिसून आले. याचवेळी पोलिसांनी दोन्ही संशयास्पद बोटीवर छापा मारून दोन्हीं बोटींची तपासणी केली. यावेळी दोन्ही बोटीच्या वेगवेगळ्या कप्प्यात एकूण १६ लाख १० हजार रुपये किंमतीचे २१ हजार ४७० लिटर डिझेल तसेच, इतर मच्छीमार बोटींना ९ हजार ३०० लिटर डिझेल पी करून मिळविलेले ६ लाख ८७ हजार रुपयांची रोख रक्कम आढळून आली. त्यामुळे पोलिसांच्या पथकाने डिझेलसह रोख रक्कम तसेच डिझेलची साठवणूक करून विक्रीसाठी वापरण्यात आलेल्या १२ लाख रुपये किंमतीच्या दोन बोटी असा तब्बल ३५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. तसेच सदर बोटींवर बेकायदेशीरित्या डिझेलची साठवणूक करून त्याची विक्री करणाऱ्या सलीम अब्दुल हमीद शेख (५०), आसिफ नेमुद्दीन वलीयनी (४६), प्रवीण पंढरीनाथ नाईक (३४), विठ्ठल धोंडीबा देवकाते (१९) आणि दत्ता धोंडीबा देवकाते (२४) या पाच आरोपींना अटक केली.

हे आरोपी समुद्रातील मोठ्या जहाजातून ६० रुपये लिटर प्रमाणे डिझेलची खरेदी करून सदरचे डीझेल ७३ ते ७५ रुपये दराने विक्री करीत असल्याचे तपासात आढळून आले आहे. सदरची कारवाई पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सहपोलिस आयुक्त डॉ. जय जाधव, गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयसिंह भोसले, सुनिल शिंदे, सुनिल पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश गज्रल, हर्षल कदम यांच्यासह मुंबई शिधावाटप विभागाचे नियंत्रक कान्हुराज बगाटे, उपनियंत्रक ज्ञानेश्वर जवंजाळ, सहाय्यक शिधावाटप अधिकारी सुभाष डुंबरे आणि शिधावाटप निरीक्षक रणजीत नलावडे यांच्या संयुक्त पथकाने केली.

# तळा नगरपंचायतीच्या चार ही प्रभागात प्रचाराचा धुमघडाका अंतिम टप्प्यात ; रॅलीतून जोरदार शक्ती प्रदर्शन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणूकीच्या चार प्रभागात प्रचाराला चांगलाच वेग आला असून रॅंलीच्या माध्यमातून जोरदार शक्ती प्रदर्शन करून अंतिम टप्प्यात येऊन पोह-ोचला आहे. या ४ प्रभागात काही ठिकाणी दुरंगी, तिरंगी, चौरंगी मात्र प्रभाग १४ मध्ये पंचरंगी लढत होत आहे. शिवसेना-राष्ट्रवादी हि खरी लढत असुन तीन उमेदवार अपक्ष उमेदवार आपले नशीब आजमावण्यासाठी शड्ड ठोकून उभे आहेत. त्यामुळे या प्रभागा कडे संपूर्ण तालूक्याचे लक्ष वेधून घेतले आहे. या प्रभाग १४ मध्ये रितेश मुंढे, (रवी भाऊ मुंढे भाजप प्रदेश सचिव यांचे सुपुत्र आहेत) तबस्सुम रहाटविलकर नवख्याअसून लताताई मुंढे या सामाजिक कार्यकर्त्या व राजकारणी आहेत. असे उमेदवार रिंगणात उतरले आहेत. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या देवयानी मोरे उच्च शिक्षीत, पत्रकार व सासूर वाशीण आहेत.




शिवसेनेचे योगेश शिर्के आहेत मागील वेळेस या भागातून काहि मतांनी पराभव झाला होता. ती भरपाई भरून काढण्यासाठी सर्व ताकदीने उतरले आहेत. सेनेने केलेला विकास व सामाजीक स्तरावर केलेला विकास तसेच १७ वार्डात केलेला विकास हा सेनेच्या विजयासाठी लाभदायक ठरणार आहे. या भागातून मागच्या वेळेस शिवसेनेने बाजी मारली होती. प्रभाग १० या ठिकाणी भाजपचे किशोर वेदक सामाजिक कार्यकर्ते, विविध प्रशासनाचा गाढा अभ्यास असून विविध संस्थाचे पदाधीकारी व भाजप रायगड नमो नमो जिल्हाध्यक्ष आहेत. राष्ट्रवादीचे मंगेश शिगवण ग्रामपंचायत पासून नगरसेवक झाले होते. शिवसेनेचे प्रवीण फोंडल संयमी, सुस्वभावी, सामाजिक कार्यकर्ते व सेनेचे निष्टावंत शिवसैनीक आहेत. शेकापच्या संस्कृती वेदक नवख्या असून आपले नशीबाची परिक्षा घेण्यासाठी रिंगणात उतरल्या आहेत. हे दोन प्रभाग अधिक प्रतिष्ठेचे असून प्रभाग १ मध्ये शिवसेनेच्या शुभांगी मांडवकर यांची सरळ लढत राष्ट्रवादी च्या ग्रिष्मा बामणे यांच्याशी होणारअसून सेनेकडून झुकते माप घालणारअसल्याचे चित्र दिसत आहे. प्रभाग ४या ठिकाणी सेनेच्या विद्या तळेकर असून ग्रामपंचायत असताना सदस्यपद उपभोगले असल्याने अनुभव पाठीशी आहे. तर राष्ट्रवादीच्या यामिनी म्हेतर स्थानिक असून नवख्या आहेत. तर शेकापच्या रोशनी तळेकर या देखील नवख्या आहेत. प्रचाराच्या अंतीम टप्प्यात आमदार, नामदार पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी प्रचाराला उतरले आहेत. सत्ता मिळवण्या साठी प्रत्येक पक्षात प्रयत्न केले जात असून शिवसेनेची जाहीर प्रचार सभा आज होत असून तोफाची फैरी सुटणार असल्याचे पहायला मिळणार आहे. या रण धुमाळीच्या तोफा १६ ता.सांय ६ वा. थंडावणार आहेत. या प्रभागातील मतदार सुज्ञ असून जिकडे ससा तिकडे पारधी अशी वस्तूस्थिती दिसत असली तरी मतदार राजा आहे. कोणाला निवडले कोणाला डावलले हे १९ तारखेला स्पष्ट होणार आहे. त्यामुळे संपूर्ण तालुक्यासह तळावासीयांचे या चार लढतीकडे लक्ष लागून राहिले आहे.

## मृत अर्भक सापडल्याने परिसरात खळबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील मोहोचापाडा येथील अंगणवाडीच्या बाजूला एक दिवसाचे स्त्री जातीचे मृत अर्भक सापडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणाची माहिती होताच पनवेल शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी गेले व त्यांनी सदर मृतदेह ताब्यात घेवून या मृतदेहाची गुप्तपणे विल्हेवाट लावल्याप्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


अर्जदारातर्फे वकील : अ‍ॅड.मारिया कोळी

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण
दि.चौ.अर्ज क्र.१८९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०३/२०२२

श्री.प्रभाकर रामभाऊ पाटील
रा.पाणजे, ता.उरण,
जि.रायगड, पिन नं.४००७०६ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. आयतुबाई उर्फ सुमती रामभाऊ पाटील रा.पाणजे, ता.उरण, जि.रायगड येथे दि.०२/०१/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. कै.आयतुबाई उर्फ सुमती रामभाऊ पाटील यांचे वडिलोपार्जित मालकीची व ताबे कब्जे वहिवाटीतील शेत जमीन मिळकत खालीलल वर्णन केलेल्याप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| फुंडे/१९४/५६० | १० | ७ अ | ०-५-८ |
| | १८ | १ ब | ०-७-१ |
| | १०३ | ५ अ | ०-७-० |
| | ११२ | २ अ | ०-७-१ |
| | १५१ | १ अ | ०-९-७ |
| फुंडे/१९८/२७३ | १५५ | ३ ब | ०-५-० |
| फुंडे/२३१ | ४५ | ६ अ | ०-६-१ |
| | ५९ | ४ ब | ०-५-६ |
| | ७१ | १३+१४ अ | ०-३-८ |
| फुंडे/४/१५ | ३७ | १५ | ०-११-७ |
| फुंडे/१४६ | ८२ | २ ब | ०-१४-५ |
| | ९९ | ७ अ | ०-८-६ |
| डोंगरी/५२ | १६ | २८ | ०-१२-० |
| | २१ | १५ | ०-५-० |
| | २३ | ११ | ०-८-० |
| | २७ | ४ अ | ०-५-६ |
| पाणजे/१२९/८६ | ११ | १९ | ०-६-० |

वरील मिळकतीच्या कै.आयतुबाई उर्फ सुमती रामभाऊ पाटील यांच्या सहमालकी हक्काच्या असून त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुरावयास मे.न्यायालयात दाखल कावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. आज रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयात यांचे शिक्क्यानिशी दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण



H.H.J. A.M.Mujawar

ADV. Manoj Warange

**Paper Notice**

IN THE COURT OF CIVIL JUDGE
SENIOR DIVISION AT PANVEL
CIVIL M.A. NO. 365 OF 2021
Exh No. 15/D
Next Date : 03/02/2022

1. SAVITRI ALLIAS SAVITRIDEVI DWIVEDI
Age: 80 yrs, Occupation : House Wife
2. ASHA VINOD KUMAR DWIVEDI
Age 52 yrs, Occupation : House Wile
3.VIVEK VINOD DWIVEDI
Age : 35 yrs Occupation : Job
All are residing at Room No. 23, Vallabh CHS,
Sawan Tower, CIDCO Colony, Plot No 10.Sector-1.
Kalamboli, Tal -Panvel, Dist-Raigad
4. NEHA ASHISH PANDEY
Age 35 yrs, Occupation : Job
Flat No.202, Tejas Apartment, Plot No 135.
Sector -44. Near S. S. High School,
Nerul West, Navi Mumbai — Applicants

WHEREAS applicant no one's son. applicant no two's husband and applicant no three, four's lather LATE. VINOD KUMAR DWIVEDI residing at Room No 23, Vallabh CHS Sawn Tower, CIDCO Colony, Plot No 10. Sector - 1. Kalamboli. Tal - Panvel. Dist -Raigad. died on 25/09/2020 at Criticare Hospital, Kamothe

AND WHEREAS the description of the immoveable property on the name of the decease as follow

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**1. Rat No. 23, 2nd Floor, Sawan Tower, 'A' Wing, Plot No, - 10. Sector No. - 1, Kalamboli, New Bombay Area 588 Sq.Ft. (carpet)**
**1/2 share Valued at Rs. 3,37.500/-**
**2. Unit Of Residential No. C - 273, 274, 284 Build on land or piece of land, Area 105 Sq. Yard i.e 87.79 Sq. Mts, situated at Modipon Colony, Modinagar, Dist - Gazhiyabad. Uttar Pradesh**
**2/3 share Valued at Rs. 11,20,000/-**
**3. Apartment / Flat No.24, 2 nd Floor, Sawan Tower of VALLABH Co-op Hsg Society Ltd., Plot No.10. Sector-01, Kalamboli, Navi Mumbai admeasuring about Built up area 54.36 Sq.mtrs 585.00 Sq.mtrs**
**1/2 share Valued at Rs.3,12,500/-**
**Total Valued Rs. (17,70,000/-)**

WHEREAS the above applicants had filed an application for obtaining heirship certificate in respect of the property mention is schedule. If anyone shall have any objection in regarding the decease legal heirs and if any one shall claim, right, title, interests in respect of the heirship certificate of the decease property then came betore this Honourable court withm 30 days and file their objection or complaint.

AND WHEREAS it is hereby declared that if no sufficient objection is offered before the expiration of the above period of one month ihe said court will forthwith proceed io receive proof of lhe applicants right, and to grant him legal heirship certificate in respect of the deceased property after that no one's objection or complaint may be consider

Given under my hand and the seal and singture of the court this 14 th day jan 2022

Sd/- Asst.Clark Civil Court Sr.Division Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent. Civil Court Sr.Division Panvel


## पत्रकार गौतम जाधव यांना पितृशोक

**दै.रायगड नगरी । माणगाव**



माणगाव तालुक्यातील पत्रकार गौतम जाधव यांचे वडील देऊ जाधव यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी शुक्रवार दि.१३ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले.

त्यांच्या अंत्यविधी निमित्त बौद्ध धम्म सामाजिक संस्था अध्यक्ष पंकज तांबे, सामाजिक कार्यकर्ते विकास गायकवाड, माणगाव तालुका प्रेस क्लबचे पदाधिकारी तसेच इंदापूर विभागातील अनेक मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या पाठीमागे मुलगा, सून व नातू असे कुटुंब आहे. त्यांचे शेवटचे जलदान विधी व शोक सभेचा कार्यक्रम त्यांच्या वावेदिवाळी येथील रहात्या घरी २३ जानेवारी २०२२ रोजी आयोजित करण्यात आला आहे.


मा.ए.एम.मुजावर साहेब

वकील : मनोज वारंगे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१८७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२२

1) SMT.KRISHNABAI BARKYA THAKUR
R/o.House No.243 C, Murbi Gaon, Near CNG Petrol Pump, Sector-19, Kharghar, Tal-Panvel Dist-Raigad, Navi Mumbai-410210
2) MRS.KALPANA NARESH PATIL
R/o.At Shanti Kuti Math, Taloja Panchanad Taloja Majkur, Taloja, Tal-Panvel, Dist-Raigad, Navi Mumbai-410208
3) MRS.SAVITA ANKUSH MOKASHI
R/o.Room No.107, At Taloja Panchanad Taloja Majkur, Taloja, Tal-Panvel, Dist-Raigad, Navi Mumbai-410208
4.(A) SMT.SANGITA MAHADEV THAKUR
R/o House No.243 C, Murbi Gaon, Near CNG Petrol Pump, Sector-19, Kharghar, Tal-Panvel Dist-Raigad, Navi Mumbai-410210
4.(B) MRS.MAYURI LAKHAN PATIL
R/o. At Ranjanpada, Jasai, Near Hanuman Temple, Jasai, Tal.Uran, Dist-Raigad, Maharashtra-410206
4.(C) MR.MAYUR MAHADEV THAKUR
R/o House No.243 C, Murbi Gaon, Near CNG Petrol Pump, Sector-19, Kharghar, Tal-Panvel Dist-Raigad, Navi Mumbai-410210
4.(D) MR.AMAN MAHADEV THAKUR
R/o House No.243 C, Murbi Gaon, Near CNG Petrol Pump, Sector-19, Kharghar, Tal-Panvel Dist-Raigad, Navi Mumbai-410210
(Petitioner No.4(A) to 4(D) are the Legal heirs of Late Shri.Mahadev Barkya Thakur) — अर्जदार

अर्जदारा क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील, अर्जदार क्र.४ अ यांचे सासरे आणि अर्जदार क्र.४ ब, ४ क, ४ ड यांचे आजोबा मयत कै.बारक्या काळुराम उर्फ काळ्या ठाकूर रा.मुर्बी गाव, सेक्टर १९, खारघार, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई यांचे दि.१५/०८/२०२१ रोजी खारघार, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**1) Unit Case No. Taloja Panchanand-190 F**

| Sr. No. | H. No. | A.Gts. As. | H.Ars.Point | Asstt. |
|---|---|---|---|---|
| 279 | 4 | 0-35-0 | 0.35.0 | 2.75 |

Undivided 1/7 Share in Property as per Award in Unit Case No. Taloja Panchanand-190 F

2) House No.243 C, Owe/Murbi Gaon, Sector-19, Kharghar, Tal.Panvel, Dist-Raigad, Navi Mumbai-410210

3) 1/4 undivided Share in respect of Shop No.7, Graound Floor, Royal Plaza Co.op.Housing Society Ltd. Plot No.42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

4) 1/4 undivided Share in respect of Shop No.12, Graound Floor, Royal Plaza Co.op.Housing Society Ltd. Plot No.42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

5) Shop No.10, Ground Floor, Royal Plaza Co.op. Housing Society Ltd., Plot No.42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

6) Flat No.201, B Wing, Second Floor, Royal Plaza Co.op.Housing Society Ltd, Plot No.42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

7) 6) Flat No.402, B Wing, Fourth Floor, Royal Plaza Co.op.Housing Society Ltd, Plot No.42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## रोहा महिला मंडळ अध्यक्षपदी शैलजा देसाई

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा अष्टमी शहर महीला मंडळाची जनरल सभा १० जानेवारी २०२२ रोजी रोहा येथील महीला उद्योग समीतीच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सदरच्या सभेत शैलजा सुभाष देसाई यांची रोहा महिला मंडळाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष म्हणून शैलजा देसाई,कार्यकारी मंडळाच्या अन्य पदाधिकारी व सदस्यांसमावेत ज्योती सनलकुमार उपाध्यक्ष. साधना जोशी सचीव, वंदना राजे, दिपा भिलारे. नेहा कुलकर्णी, आरती धारप, सरला पाटील, श्रद्धा सकपाळ, निशा शिंदे, संगीता वेदपाठक या सर्वाची सर्व महिला मंडळांच्या वतीने यांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आल्या.

नवनिर्वाचित अध्यक्षा शैलजा देसाई यांनी यापूर्वि शासनाच्या महसुल खात्यात३०नोव्हें.२०१२ पर्यंत ३० वर्षे प्रामाणिक व सचोटीने काम केले त्यांनंतर त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेऊन त्यांनी सामाजिक काम करण्यास सुरुवात केली आहे.रोहा रायकर पार्क येथील विकास हौसिंग सोसायटचे सचीव पदावर पाच वर्षे सक्षमतेने कामं केले ज्येष्ठ नागरिक मंडळ रोहा या संस्थेत तीन वर्षे सचीव पदाचा कार्यभार सांभाळला वसुधा कार्यकारी मंडळात सदस्या म्हणून कार्यरत आहेत.रोहा तालुका शासकीय व निमशासकीय सेवा निवृत्त संघटनेचे कार्यकारी मंडळात सदस्या म्हणून त्यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. शैलजा देसाई यांचे सामाजिक कार्यातील योग्यता पध्दतेचा विचार करुन त्यांची अध्यक्ष पदावर सर्वानुमते निवड करण्यात आल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## रिक्षा चालकाने केली वाहतूक पोलिसांना मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिक्षावर दंडात्मक कारवाई केल्याचा राग मनात धरुन रिक्षा चालकाने मारहाण केल्याची घटना खारघर वसाहत परिसरात घडली आहे.

खारघर वसाहत परिसरात एका वाहतूक पोलिसाने रिक्षा चालकावर दंडात्मक कारवाई केल्याने त्याचा राग मनात धरुन सदर रिक्षा चालकाने लोखंडी सळईने वाहतूक पोलिसाला मारण्याचा प्रयत्न केला.

या मारहाणीत वाहतूक पोलिसाला दुखापत झाली असल्याने रिक्षा चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिमेंट बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेट तुटल्याने पाणी गेले वाहून ; 30 शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याचा प्रश्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील पोश्री नदीवरील बोरगाव येथे याच वर्षी बांधलेल्या सिमेंट बंधाऱ्यात भरपूर पाणी साठले होते.मात्र त्या सिमेंट बंधाऱ्यात पाणी साठवून ठेवण्यासाठी लावलेल्या लोखंडी प्लेट या १३ जानेवारीच्या रात्री तुटल्या आणि त्या बंधाऱ्यातील सर्व पाणी वाहून गेले. दरम्यान, या बंधाऱ्याच्या पाण्यावर किमान ५० एकर जमिनीवर भाजीपाला शेती केली आहे. त्या शेतीसाठी आता पाणी कुठून आणायच्या? असा प्रश्न भाजीपाला उत्पादक शेतकरी यांना पडला आहे. जलसंधारण विभागाने ७३ लाख खर्च करून हा बंधारा बांधला असून अद्याप कोणत्याही प्रकारचे बिल अदा करण्यात आले नाही अशी माहिती उपअभियंता कार्यालयाने दिली आहे.

बोरगाव येथे पोश्री नदीवर जलसंधारण विभागाच्या माध्यमातून ८३ मीटर लांबीचा सिमेंट बंधारा २०२१ मध्ये बांधला होता.त्या बंधाऱ्यात तब्बल ७०० मीटर अंतरामध्ये पाणी साठून राहिले होते. त्यामुळे बोरगाव मधील शेतकऱ्यांनी तेथे असलेल्या शेतजमिनीत भाजीपाला पिकाची लागवड डिसेंबर महिन्यापासून करण्यास सुरुवात केली आहे.तेथील ५- एकर जमिनीवर बोरगा-वातील ३० शेतकऱ्यांनी भाजीपाला लावण्यास सुरुवात केली असून त्या भाजीपाला पिकासाठी



सिमेंट बंधाऱ्यातील पाणी नेण्याची तजवीज देखील शेतकऱ्यांनी कृषिपंप लावून केली आहे. आता साधारण सहा ते आठ इंच उंचीची रोपे शेतात डवरण्यास सुरुवात झाली असून शेतकरी गेली दोन महिने शेतांची मशागत करण्यात व्यस्त होता या सिमेंट बंधाऱ्यामुळे शेताजवळ पाणी मिळाले असल्याने बोरगावातील अनेक शेतकऱ्यांनी भाजीपाला शेतीकडे आपला कल वळविला होता.

मात्र १३ जानेवारीच्या रात्री अचानक त्या सिमेंट बंधाऱ्याला असलेल्या चार लोखंडी प्लेट पैकी एका लोखंडी प्लेट मधून पाणी गळती झाली आणि त्यामुले बंधाऱ्यातील सर्व पाणी आज सकाळपर्यंत वाहवून गेले आहे. त्यामुळे त्या सिमेंट बंधाऱ्यात आता पाणीच शिलक्क राहिले नाही.

या बंधाऱ्याला पाणी अडवून ठेवण्यासाठी लावण्यात आलेल्या लोखंडी प्लेट या गंजलेल्या असल्याने त्यातील पाण्याच्या मध्यभागी असलेली लोखंडी प्लेट मधून पाणी बाहेर पडू लागले आणि रात्रीतून सर्व पाणी वाहून गेले आहे. त्याचा परिणाम सिमेंट बंधाऱ्यात साठून राहिलेले ७०० मीटर अंतरावरील पाणी वाहून गेले आहे.त्याचा परिणाम आता त्या भागात बंधाऱ्याचे पाणी मिळणार म्हणून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आपला भाजीपाला कसा जगावयाचे हा प्रश्न निर्माण झाला आहे.बंधाऱ्यात पाणीच नसल्याने ५ एकर जमिनीवर लावलेला भाजीपाला पिकासाठी पाणी कुठून आणायचे?हा प्रश्न त्या सर्व शेतकऱ्यांना भेडसावत आहे. तर जुन्या लोखंडी प्लेट लावलेल्या असल्याने बंधाऱ्यातील पाणी त्या प्लेट पाण्याच्या झोतात तुटल्याने पाणी वाहून गेले आहे असा आरोप आता शेतकरी करीत आहेत. त्यामुळे सिमेंट बंधाऱ्यातील पाणी लोखंडी प्लेट तुटल्याने वाहून गेल्याची माहिती मिळताच जलसंधारण विभागाचे अधिकारी यांनी आज सकाळी बोरगाव येथे जाऊन बंधाऱ्याची पाहणी केली.

आता जलसंधारण विभागाकडून त्या ठिकाणी तुटलेल्या लोखंडी प्लेट बदलून पुन्हा पाणीसाठा होईल का?याची चाचपणी स्थानिक शेतकऱ्यांकडून घेतली आहे. पोश्री नदी ज्या भीमाशंकर अभयारण्य भागातून वाहत येते आणि त्यामुळे पुन्हा सिमेंट बंधारा पनयने भरेल काय ?याची माहिती जलसंधारण विभाग गेहत आहे. आता देखील नदीमद्ये थोड्याफार प्रमाणात पाणी वाहत असून ते पाणी साठवून बंधारा पुन्हा पाण्याने भरेल काय?याचा अभ्यास केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला पिकासाठी डफावर दूरवरून पाणी आणण्याची वेळ येणार नाही असे आश्वासन जलसंधारण विभागाने दिले आहे.

# हेमंत बिरामणे यांची जयंती साधेपणाने साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दिवंगत उप शहरप्रमुख हेमंत सहदेव बिरामणे यांची जयंती कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अगदी साधेपणाने साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या हेमंत नाका या नामफलकास कार्यसम्राट उप शहरप्रमुख प्रमोद नायक यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. हेमंत

बिरामणे यांची उणीव नेहमीच जाणवत राहणार आहे पक्षाशी एकनिष्ठ राहून सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणारे, जनमानसात एक वेगळाच ठसा त्यांनी उमटवला होता. त्यांच्या जाण्याने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. कणखरपणा आणि अंगी असलेल्या वक्तृत्वाने त्यांना मानणारा मोठा वर्ग आजही त्यांची आठवण काढत आहेत. अश्वपालकांना भेडसावत असलेल्या अडीअडचणीला सामोरे जाणारे हे एकमेव व्यक्तीमत्व होते.



अश्वपालकांसाठी हेमंत बिरामणे यांच्या रूपाने खूप मोठा आधार होता असे माथेरान नागरी सहकारी पतसंस्था सचिव तथा वन समिती अध्यक्ष योगेश जाधव यांनी आपल्या छोटेखानी भाषणात स्पष्ट केले. यावेळी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगरसेवक राकेश चौधरी, मीरा फाउंडेशनच्या सर्वेसर्वा रेखा चौधरी, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, पतसंस्था सभापती हेमंत पवार, काँग्रेसचे भास्कर शिंदे, राकेश कोकळे, विठ्ठल पवार, अख्तर खान, हर्ष शिंदे, काँग्रेस महिला आघाडी अध्यक्षा वर्षा शिंदे, रवी बिरामणे, विकास पार्टे, अनिस महापुळे, पत्रकार संतोष खाडे, एकनाथ शिंदे, शैलेश भोसले, समीर पन्हाळकर आणि प्रसिद्धी प्रमुख अमोल चौगुले यांसह नागरिक उपस्थित होते.

# अजित वेणुगोपाल व इतर यांची फसवणुकीच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**दै.रायगड नगरी । उरण**

आईल टूल्स अँड इंटरनॅशनल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या अफरातफर तसेच फसवणुकी संबंधी चा वाद येथील खालापूर प्रथम वर्ग न्यायालयात चालू होता. यात कंपनीतर्फे सुशीलकुमार राम मेहता (उत्तराखंड )यांनी चुकीची माहिती सादर करून श्री अजित वेणुगोपाल,सजित वेणुगोपाल, कुण्णीमल वेणुगोपाल,गोपाकुमार कट्टू यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. वेणुगोपाल यांच्यावर दबाव आणण्याचा हेतूने तत्कालीन कंपनीचे संचालक श्री मेहता यांनी वेणुगोपाल यांच्यावर गुन्हा दखल केला होता. सदर बाब अमेरिका स्थित कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर पॉल डी वॉटरस यांच्या निदर्शनास आली की वरील आरोपी कडून कोणत्याही प्रकारची फसवणूक झाली नाही म्हणून त्यांनी सदर केस मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर श्री पॉल वाटर्स यांनी श्री गोपाळे यांच्यामार्फत सदर खटला मागे घेण्यासाठी अर्ज दाखल केला. सदर खटल्याची अंतिम सुनावणी दिनांक ०५/०१/२०२२ रोजी येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आर डी वाबळेसाहेब ,खालापुर यांच्यासमोर झाली त्यानुसार वेणुगोपाल कुटुंबाची या खटल्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. वेणुगोपाल यांच्या वतीने ॲड. संतोष तेन्हळीकर आणि ॲड कामरान दुबे यांनी काम पाहिले.

# हज हाऊस यूपीएससी कोचिंग इन्स्टिटयूट वाचवण्यासाठी समाजाने पुढाकार घेणे आवश्यक

**दै.रायगड नगरी । खोपोली**

गेल्या दोन ते तीन वर्षात मुंबई येथील हज हाऊस यूपीएससी रेसिडेंशियल कोचिंग इन्स्टिट्यूट ही अल्पसंख्यांक होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे दर्जेदार मार्गदर्शन करणारी संस्था म्हणून देशात नावारूपास आली. पूर्वी हज हाऊस विदेश मंत्रालयाच्या अधिपत्याखाली असताना केवळ ५० विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी निवड केली जायची. त्यावेळेस चांगल्या पायाभूत सुविधा नसल्याने ३०-४० विद्यार्थीच प्रवेश घ्यायचे आणि शेवटपर्यंत केवळ २०-२५ विद्यार्थीच टिकत असत. तसेच एकवर्षाच्या प्रशिक्षण कालावधी नंतर विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश मिळत नसे. त्यामुळे निकाल उत्साहवर्धक येत नसत.

पण काही वर्षांपूर्वी हज हाऊस ही संस्था अल्पसंख्यांक मंत्रालयाच्या आणि मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांच्या अधिपत्याखाली आली. संस्थेला नवीन सीईओच्या रुपात एक विकासाभिमुख काम करणारा आणि दूरदृष्टी असणारा प्रशासक मिळाला. या सीईओंच्या कालखंडात हज हाऊसमध्ये कमालीचे परिवर्तन आले. पायाभूत सुविधांचा विकास झाला. विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण आणि सुविधा मिळू लागल्या. पूर्वी केवळ ५० विद्यार्थ्यांसाठी असणारी प्रशिक्षणाची सोय टप्प्याटप्प्याने वाढवून २०० विद्यार्थ्यांची करण्यात आली. निवडक मेहेनती सीनिअर विद्यार्थ्यांना पुन्हा हज हाऊसमध्ये अभ्यास करण्याची संधी देण्यात येऊ लागली. ज्याचा फायदा नवीन विद्यार्थ्यांना देखील होऊ लागला. याचे परिणाम निकालात परावर्तीत होताना आता कुठे दिसू लागले होते .

यूपीएससी २०२० च्या परीक्षेत १२० विद्यार्थ्यांपैकी ३० जणांनी पूर्व परीक्षा पास होऊन मुख्य परीक्षा दिली. त्यापैकी ११ जणांनी मुख्य परीक्षा पास होऊन मुलाखत दिली आणि ११ पैकी ३ जण परीक्षा उत्तीर्ण झाले. यूप-ीएससी २०२१ च्या परीक्षेत १८० विद्यार्थ्यांपैकी ३७ जण पूर्व परीक्षा पास होऊन मुख्य परीक्षा देत आहेत. पण यादरम्यान जुन्या सीईओंचा कार्यकाळ संपला आणि नवीन सीईओंच्या उदासीन धोरणांमुळे आणि हज हाऊसमधील कर्मचाऱ्यांच्या लॉबिमुळे (ही कर्मचारी लॉबी मुंबईतील टूरीजम एजन्सीच्या हस्तक असून हज किंवा आखातात जाणाऱ्या मुंबईतील धन दांडग्यांसाठी हज हाऊसमध्ये विद्यार्थ्यांचे राहणे




अडचणीचे ठरत आहे) आणि विलासी वृत्तीमुळे पुन्हा एकदा ही संस्था रसातळाला जाते की काय अशी परिस्थिती उद्भवली आहे.

विद्यार्थी संख्या पुन्हा २०० वरून कमी करून ५० केली आहे. सीनिअर विद्यार्थ्यांना हज हाऊसमधून काढून टाकण्यात आले आहे. जे विद्यार्थी २०२१ ची णझडउ मेन्स लिहित आहे त्यांना देखील परीक्षेनंतर हज हाऊस सोडण्यास सांगितले आहे. UPSC २०२२ ची प्रेलिम केवळ ४ महिन्यांवर आहे, अशात हे विद्यार्थी कुठे जाणार. णझडउ २०२२ ची प्रेलिम केवळ ४ महिन्यांवर आहे तरी सुद्धा नवीन बॅचच्या ५० विद्यार्थ्यांना ( जी संख्या २०० असावयास हवी होती ) अजून जॉइनिंग मिळालेली नाही. पूर्वी मिळणाऱ्या बहुतांश सुविधा बंद करण्यात आल्या आहेत.

अशात समाजातील क्रीम असणाऱ्या हुशार होतकरू विद्यार्थ्यांचे परीक्षेच्या पूर्वी हाल होत आहेत आणि याचा सर्वात जास्त फटका महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना बसला आहे. २०२० मध्ये हज हाऊसमधून जे ११ मुस्लिम विद्यार्थी इंटरव्ह्यूसाठी पात्र ठरले होते. त्यातील ५ विद्यार्थी हे मराठी मुसलमान होते, म्हणजेच महाराष्ट्रीयन होते. हज हाऊस सोडून महाराष्ट्रातील मुलांना इतर कोणतीही संस्था नाही. राज्य शासनाकडून देखील कोणतीही योजना नाही जशी इतर समुदायंसाठी सारथी, बार्टी , महाज्योती आहेत. महाराष्ट्रातील मुस्लिम मुलींसाठी तर हे एक सुरक्षित, जवळ असलेले प्रशिक्षण केंद्र होते. पण नवीन सीईओंच्या उदासीन धोरणांमुळे महाराष्ट्राला लाभलेली एक चांगली संस्था लयाला जाईल अशी भीती आहे. त्यामुळे सर्व जागरूक नागरिकांना आवाहन आहे की त्यांनी देशसेवेचे स्वप्न पुर्ण करण्यात योगदान देणाऱ्या या संस्थेला वेळीच वाचवण्यासाठी आवश्यक ते पाऊल उचलावे. पूर्वी ज्या सुविधा होत्या त्या विद्यार्थ्यांना परत मिळाव्यात यासाठी आवाज उठवावा, अशी मागणी होत आहे.

### रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीसाठी किशोरभाई म्हात्रे उपसणार उपोषणाचे हत्यार

# १९ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार उपोषण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे परिसरातील रिलायन्स (पूर्वीची आय.पी.सी.एल) कंपनीमध्ये उर्वरित स्थानिक प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरीत सामवून घ्यावे या मागणीसाठी स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे यांनी बुधवार दिनांक १९ जानेवारी पासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचे हत्यार उपसण्याचे ठरविले आहे.

याबाबतचे निवेदन रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. रिलायन्सच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरींग डिव्हिजन या युनिट मध्ये परिसरातील अनेक गावांतील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत. त्यानुसार या कंपनीत येथील काही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्या मिळाल्या. परंतु उर्वरित शेकडो प्रकल्पग्रस्त शेतकरी अजूनही या कंपनीतील कायमस्वरूपी नोकरीपासून वंचित आहेत. त्यामुळेच येत्या काही दिवसात कंपनी व्यवस्थापनाने उर्वरित प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्यावे अन्यथा हे बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा किशोरभाई म्हात्रे यांनी या निवेदनामार्फत दिला आहे.

जिल्हाधिका-यांना दिलेल्या निवेदनात किशोरभाई म्हात्रे यांनी म्हटले आहे की, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड प्रकल्पाच्या अवतीभोवती राहत असणाऱ्या बहुतांशी शेतकऱ्यांच्या जमिनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या वतीने त्या काळात अत्यंत अल्पदराने संपादित करून पूर्वीच्या केंद्र शासनाच्या इंडियन पेट्रोकेमिकल्स कार्पोरेशन लिमिटेड म्हणजेच सध्याच्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कारखान्यासाठी देण्यात आल्या होत्या. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळणे संदर्भात दाखले देऊन कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची हमी त्यावेळी देण्यात आली होती. असे असताना या विषयावर अनेक धरणे आंदोलने केल्यानंतर दि. २५/०४/१९९० रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार यांच्या दालनात बैठक होऊन ६१८ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरीत घेण्यात आले होते. तसेच उर्वरित प्रकल्पग्रस्तांना पुढील टप्प्यात नोकरीत सामावून घेण्याचे आदेश देऊन त्याची सर्वस्वी जबाबदारी रायगड जिल्हाधिकारी प्रशासनावर सोपविण्यात आली होती. परंतु आजतागायत तब्बल ३१ वर्ष उलटूनही केवळ ५० ते ६० प्रकल्पग्रस्तांनाच दुसऱ्या टप्प्यात रिलायन्स इंडस्ट्रीजने नोकरीत सामावून घेतलेले असून उर्वरित ५४७ प्रकल्पग्रस्त नागरिक अद्यापही नोकरीपासून वंचित आहेत.

स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे व समितीच्या पदाधिका-यांनी मागील दोन वर्ष वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करून देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ठोस कारवाई तर झाली नाहीच परंतु साधे प्रतिउत्तराचे पत्र देखील न दिल्याने प्रकल्पग्रस्त नागरिकांनी याबाबत खंत व्यक्त केली आहे.

आय.पी.सी.एल कारखान्यासाठी आम्हा सर्व प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या जमिनी त्या काळात कमी मोबदल्यात घेतलेल्या आहेत. त्यामुळे आमचा नोकरीचा प्रश्न हा जिल्हा प्रशासनानेच सोडवायचा आहे, तरी प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या नोकरीचा प्रश्न शासनाने गांभीर्याने विचार करून सोडवावा. दि. २५/०४/१९९० रोजीच्या निर्णयानुसार रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड च्या व्यवस्थापन मंडळाने उर्वरित सर्व प्रकल्पग्रस्तांना लवकरात लवकर कायमस्वरूपी नोकरीत सामावून घ्यावे अन्यथा स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती बुधवार दि. १९/०१/२०२२ पासून सर्व प्रकल्पग्रस्तांच्या साथीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपो-षणास बसणार असल्याचा इशारा भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष तथा स्थानिक संघर्ष समितीचे अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे यांनी जिल्हा प्रशासनाला दिला.

# शासनाचे मनाई आदेश मोडून एपीएमसी मार्केटमध्ये मापाड्यांचे आंदोलन

### संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह दिडशे मापाड्यांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोना या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने लागू केलेल्या मनाई आदेशाचा भंग करुन कांदा बटाटा मार्केट मधील एपीएमसीच्या मुख्य कार्यालयासमोर बेकायदेशीररीत्या आंदोलन करणाऱ्या महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे प्रमुख पदाधिकाऱयांसह दिडशे मापाडी कामगांराविरोधात एपीएमसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्स्पोर्ट व जनरल कामगार युनियनचे संयुक्त सरचिटणीस चंद्रकांत पाटील, रविकांत पाटील, शाम ढमाले, गजानन कुरडे, सुशीलकुमार गावडे, मधुकर जाधव, रविंद्र माने या प्रमुख पदाधिकाऱयांचा समावेश आहे.

सध्या राज्यात करोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव पुन्हा मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने करोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. लोकांनी करोनाग्रस्त रुग्णांच्या संपर्कात येऊ नये यासाठी सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यासाठी शासनाकडून व नवी मुंबई पोलिसांकडून प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. असे असतानाही महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्स्पोर्ट व जनरल कामगार युनियनच्या पदाधिकाऱयांनी गत सोमवारी एपीएमसी मार्केट मधील मापाड्यांच्या मागण्यांसदर्भात कांदा बटाटा मार्केटमधील एपीएमसीच्या मुख्य कार्यालयासमोर विनापरवानगी आंदोलन केले.

या आंदोलनात महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्स्पोर्ट व जनरल कामगार युनियनचे संयुक्त सरचिटणीस चंद्रकांत पाटील, रविकांत पाटील, शाम ढमाले, गजानन कुरडे, सुशीलकुमार गावडे, मधुकर जाधव, रविंद्र माने या प्रमुख पदाधिकाऱयांसह सुमारे दिडशे मापाडी कामगार सहभागी झाले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी करोना या संसर्गजन्य आजाराच्या प्रसाराच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना केले नसल्याचे तसेच त्यांनी सामाजिक अंतर न बाळगता, तसेच मास्क न लावता गर्दी केल्याचे आढळुन आले. त्यामुळे एपीएमसी पोलिसांनी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह सुमारे दीडशे मापाड्यांविरोधात शासनाच्या मनाई आदेशाचा भंग केल्याप्रकरणी तसेच साथरोग प्रतिबंधक अधिनियम, महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.